• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३४० • मंगळवार,दि. १२ मार्च २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रुपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 340 • Tuesday 12 March 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■





बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

## गद्दारांना धडा शिकवण्यासाठी भाजपला महाराष्ट्रातून हद्दपार करणारच

**मुंबई । वृत्तसेवा**

**आपल्याला सोडून काहीजण जात आहेत त्यांना खुशाल जाऊ द्या. त्यांच्यावरचा गद्दारीचा डाग पुसला जाणार नाही. पण, एखादा खडा इकडचा तिकडे केल्यावर शिवसेनेचा गड ढासळेल असे कुणाला वाटत असेल तर त्यांना शिवसेना कळलेली नाही. पक्षात मोठे झालेले गेले तरी ज्यांनी मोठे केले ते पदाधिकारी माझ्यासोबत आहेत. शिवसेनेचा किल्ला अभेद्य आहे, अशा शब्दांत शिवसेना (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी वायकरांच्या पक्षांतरावर भाष्य केले.**



गोरेगावातील शिवसेना शाखांच्या भेटीदरम्यान उपस्थितांशी संवाद साधला. शिवसेनेचा किल्ला अभेद्य आहे. इथे काल जी गर्दी होती ती आजही आहे, असे ठाकरे म्हणाले. यावेळी भाजपवर जहरी टीका करताना,भाजपमध्ये त्यांचा कोणी उरलेला नाही. त्यामुळे त्यांना बाहेरच्या लोकांना आयात करावे लागत आहेत. भाजपमध्ये आता सगळे आयाराम आहेत. अस्सल भाजपवाल्यांनीच आता एकमेकांना प्रश्न केला पाहिजे की त्यांना नेमके कसले लोक हवे आहेत. आज काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस ही महाविकास आघाडी आपल्यासोबत आहे. एका बाजूला देशभक्त आणि दुसर्या बाजूला द्वेषभक्त असा लढा आहे. जातपात बाजूला ठेवून देश हाच माझा धर्म आणि देश आणि लोकशाही रक्षणासाठी एकत्र यायला हवे,असे आवाहनही ठाकरे यांनी यावेळी केले. लालचेपोट आणि सत्तेच्या हव्यासापोटी गद्दार सरकारमध्ये सहभाग होत आहेत. परंतू महाराष्ट्राची जनता उघड्या डोळ्याने बघतेय आणि नक्कीच येणाऱ्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीत गद्दारांना आणि फोडाफोडी करणाऱ्या गांडूच्या अवलादींना धडा शिकवल्याशिवाय शांत बसवणार नाही. एकीकडे तरूणाईच्या हाततून काम हिसकावून घेण्याचे पाप या भाजप सरकारने केले. राज्यातील औद्योगिक प्रकल्प राज्याबाहेर घेवून जाण्यासाठी याच सत्ताधाऱ्यांनी केंद्र सरकारला मदत केली. परंतू ही हुकूमशाही जास्त काळ चालणार नाही. आम्ही हे तुघलकी, लोकशाही विरोधी सरकार घालवणारचं, याशिवाय शांत बसणार नाही असे ठाम वचन यावेळी उध्दव ठाकरेसाहेबांनी महाराष्ट्राच्या जनतेला दिलं.



**मुंबई – बीड लोकसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांची राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय खा.शरद पवारसाहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी प्रदेशाध्यक्ष आ.जयंतराव पाटील, बीड विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आ.संदीपभैय्या क्षीरसागर हे देखील उपस्थित होते. लोकसभा निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते सज्ज. निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – शरद पवार गटाचे अधिकृत उमेदवारच विजयी होतील.**

### आष्टीत पोलिसांचा रुट मार्च

**आष्टी । प्रतिनिधी**

आगामी काळात येऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता कुठल्याही क्षणी लागण्याची शक्यता असल्याने आष्टी पोलिस सज्ज झाले आहेत.त्या अनुषंगाने कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आष्टी पोलिसांकडून आष्टी शहरात रुट मार्च काढण्यात आला. राज्यात लोकसभा निवडणुकांच्या हालचालींना वेग आला असून विविध पक्षांकडून लोकसभेसाठी उमेदवार जाहीर करण्यात येत आहेत.त्यामुळे निवडणुकीची आचारसंहिता कधी ही लागू शकते.लोकसभा निवडणूकीत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी व गुन्हेगारांवर वचक निर्माण व्हावा त्याअनुषंगाने आष्टी पोलिसांकडून रविवार दि.१० मार्च रोजी सायंकाळी रुट मार्च काढण्यात आला.

## बीड लोकसभा निवडणुकीकडे राज्याचे लक्ष

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभेच्या निवडणुकीचे वारे वेगानं वाहू लागले आहेत. देशभरात राजकीय पक्षांची जय्यत तयारी सुरू आहे. महाराष्ट्रातही ती तयारी सुरू आहे, पण अद्याप कोणत्याही पक्षानं उमेदवारीचं चित्र स्पष्ट केलेलं नाही. चित्र स्पष्ट व्हायचं असलं तरी राज्याचंच नव्हे तर देशाचं लक्ष लागून असलेले अनेक लोकसभा मतदारसंघ महाराष्ट्रात आहेत. त्यापैकी अत्यंत महत्त्वाचा मतदारसंघ म्हणजे बीड लोकसभा मतदारसंघ. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर पंकजा मुंडेंच्या नाराजीच्या चर्चा सातत्यानं पाहायला मिळाल्या. मुंडे बंधू-भगिणींच्या संघर्षामुळंही हा मतदारसंघ चर्चेत होता. भाजपच्या प्रीतम मुंडे या ठिकाणच्या विद्यमान खासदार आहेत. पण राष्ट्रवादीतील फुटीनंतर अजित पवारांना साथ देत धनंजय मुंडेही भाजपबरोबर गेले. त्यामुळं याठिकाणी रंजक समीकरण पाहायला मिळणार आहे. गोपीनाथ मुंडे



यांच्यानंतर पंकजा मुंडेयांनी जिल्ह्याच्या राजकारणात जम बसवण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्यासमोर भाऊ धनंजय मुंडेंचं मोठं आव्हान होतं. पण आता दोघे राजकीयदृष्ट्या तरी एकत्र आहेत. उमेदवारीचं चित्र स्पष्ट होईपर्यंत काहीही नक्की नसलं तरी मुंडेंच्याच घरात उमेदवारी राहणार अशा चर्चा आहेत. आता भाजप पंकजा मुंडेंना यावेळीही काही नवा धक्का देणार का? याची उत्सुकता सगळ्यांमध्ये आहे. बीड लोकसभा मतदारसंघ हा सध्या भाजपचा बालेकिल्ला आहे असं म्हणता येईल. कारण २००४ चा अपवाद वगळता गेल्या आठ निवडणुकांमध्ये या ठिकाणी मतदारांनी भाजपला पसंती दिली आहे. पण हा मतदारसंघ सुरुवातीपासूनच भाजपचाच गड होता असं मात्र नाही. या मतदारसंघावर १९९५ पर्यंत काँग्रेसची पकड असल्याचं पाहायला मिळालं. काँग्रेसच्या केसरबाई क्षीरसागर इथून तीन वेळा लोकसभेत पोहोचल्या.

## पुन्हा होणार १० हजार शिक्षक भरती

**नागपूर । वृत्तसेवा**

जे विद्यार्थी शिक्षक भरतीची वाट पाहत आहेत, त्यांच्यासाठी एक खूप मोठी आनंदाची बातमी आलेली आहे. कारण नुकतीच राज्यामध्ये ११००० शिक्षकांच्या भरतीची यादी जाहीर करण्यात आली होती. त्याचप्रमाणे त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी देखील चालू आहे. आणि अशातच शिक्षण भरतीसाठी एक पुन्हा एक मोठा निर्णय घेतला आहे. तो म्हणजे आता महाराष्ट्रातील सरकारी तसेच अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांच्या रिक्त जागा मोठ्या प्रमाणात आहे. आता दरवर्षी निवृत्त होणाऱ्या शिक्षकांची संख्या वाढत चाललेली आहे. या सगळ्याचा परिणाम असा होतो की, शाळेमध्ये शिक्षक खूप कमी असतात आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे मोठे नुकसान होते. या सगळ्याचा विचार करून आता शिक्षकांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतलेला आहे. दर ५ ते ६ वर्षातून एकदाच शिक्षक भरती होते. त्यामुळे शाळांची मोठ्या प्रमाणात अडचण होते. परंतु आता शिक्षण विभागाने दरवर्षी टीईटी परीक्षा घेऊन जास्त प्रमाणात शिक्षकांची भरती करण्याचा निर्णय घेतलेला आहे. येत्या जून महिन्यामध्ये राज्यातील तब्बल १० हजार शिक्षकांची टीईटी परीक्षा होणार आहे. शिक्षण खात्याने देखील परीक्षेची तयारी करण्याची सूचना दिलेली आहे. आणि याचे वेळापत्रक देखील लवकर जाहीर केले जाणार आहे.



**बीड – बीड विधानसभेचे लोकप्रिय आ. संदीपभैय्या क्षीरसागर यांची महाराष्ट्रातील खासगी कोचिंग क्लासेसची संघटना असलेल्या प्रोफेशनल टीचर्स असोसिएशनच्या शिष्टमंडळाने भेट घेतली. केंद्र सरकारच्या कोचिंग क्लासेसच्या नियमनासाठी काही अन्यायकारक तरतुदी आहेत आणि त्यामध्ये योग्य सुधारणा कराव्यात अशी मागणी करणारे निवेदन त्यांनी माझ्यासमोर मांडले आणि त्यावर आपण विश्वास ठेवला पाहिजे. किरकोळ व्यवसायासारखे सामान्य गृह कोचिंग क्लासेस चालवणाऱ्या तरुणांवर निर्बंध आणून, या निर्णयामुळे बुडीत होण्याची भीती आहे.**



## आता अन्याय पुरे झाला -पंकजा मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

पंकजा मुंडे भाजपमध्ये नाराज असल्याची चर्चा होती. तसेच त्यांनी वेळोवेळी पक्षाबाबत आणि आपल्या भूमिकांबाबत केलेली वक्तव्ये चर्चेत होती. आता लोकसभा निवडणुकांच्या वातावरणात पुन्हा एकदा त्यांच्या वक्तव्याची चर्चा होत आहे. आता कलीयुगात पाच वर्षांचा वनवास पुरे झाला, असे पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत. त्यांनी या वक्तव्यातून नेमके काय संकेत देत आहेत, याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. माझ्या समर्थकांपुढे मला कोणतेही पद महत्त्वाचे नाही, असेही पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत. पूर्वीच्या काळी १४ वर्षांचा वनवास होता आता पाच वर्षांचा वनवास पुरे झाला, असे त्या म्हणाल्या आहेत. आपण एवढे दिवस वनवास भोगला आहे. वनवास पाचच वर्षांचा असावा या युगात. जुन्या काळात १४ वर्षांचा वनवास होता, आम्हाला पाच वर्षांचा वनवास पुरे झाला की तुम्हाला अजून पाहिजे? तुम्ही सगळे आहात ना माझ्याबरोबर? तुमच्या प्रेमाव्यतिरिक्त काही मिळालेलं नाही. माझ्या जीवनाबद्दल मी फार बोलत नाही. पण मी फार दुःख, यातना, वेदना भोगून झाल्या आहेत. सगळं काही भोगूनही मी चेहरा हसरा ठेवते. याचं कारण तुम्ही म्हणजेच माझे सगळे कार्यकर्ते आहात, असेही पंकजा मुंडे म्हणाल्या.

### लातूर जिल्ह्यात ५१ शिक्षकांना मिळाली नियुक्ती

लातूर – राज्य शासनाच्या शिक्षण विभागाकडून पवित्र पोर्टलवर शिक्षकांची निवड यादी जाहीर करण्यात आली होती. त्यानुसार लातूर जिल्ह्यास ५५ शिक्षक मिळाले असून, सोमवारी ५१ शिक्षकांना सीईओ अनमोल सागर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. मागील अनेक वर्षापासून शिक्षक भरती झालेली नव्हती. त्यामुळे राज्य शासनाने शिक्षक भरतीची प्रक्रिया राबविली असून, लातूर जिल्ह्यातून ८० रिक्त जागांची माहिती पवित्र पोर्टलवर भरण्यात आली. त्यानुसार पहिल्या यादीत ५५ प्राथमिक पदवीधर शिक्षकांची निवड झाली असून, ४ मार्च रोजी कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली होती. तर सोमवारी जिल्हा परिषदेचे सीईओ अनमोल सामान्य प्रशासनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन दाताळ, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, उपशिक्षणाधिकारी प्रमोद पवार, बाबासाहेब पवार, कक्ष अधिकारी हिरागीर गिरी, शिक्षण विस्तार अधिकारी दिलीप हैबतपुरे, संजीव पारसेवार, अशोक माळी यांच्या उपस्थितीत समुपदेशनाने ५१ प्राथमिक पदवीधर शिक्षकांना समुपदेशनाने नियुक्ती देण्यात आली आहे. यामध्ये लातूर तालुक्यात ७, औसा तालुक्यात ६, अहमदपूर ७, निलंगा १३, शिरूर अनंतपाळ २, देवणी २, जळकोट २, उदगीर ४, चाकूर ५ आणि रेणापूर तालुक्यात ३ प्राथमिक पदवीधर अशा एकूण ५१ जणांना नियुक्ती देण्यात आली आहे.

### नागरिकत्व सुधारणा कायदा लागू

नागपूर – नागरिकत्व सुधारणा कायदा म्हणजेच सीएए बाबत महत्वाची बातमी समोर आली आहे. केंद्र सरकारकडून सीएए कायद्याची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. केंद्रीय गृह मंत्रालय सोमवारी (दि.११ मार्च) नागरिकत्व सुधारणा कायद्याचे नियम अधिसूचित केले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह २०१९ पासून सीएए लागू करण्यासाठी आग्रही भूमिका मांडत आले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी १० फेब्रुवारी रोजी नागरिकत्व दुरुस्ती कायद्याबाबत मोठी घोषणा केली होती. दरम्यान, आता सीएएच्या अंमलबजावणीचा मार्ग आता मोकळा झाला आहे. लोकसभा निवडणुकीआधी देशात सीएए कायदा लागू करणार असल्याचे शाह म्हणाले होते. त्यानंतर आता गृहमंत्रालय ॲक्शन मोडवर आले आहे. सूत्रांमधून मिळालेल्या माहितीनुसार, सीएएचे नियम लागू करण्यासाठी अंतिम प्रक्रिया सुरु आहे. काही आठवड्यांपूर्वीच केंद्रीय गृहमंत्रालयाने यासाठी या कायद्याचे नियम बनवण्यासाठी एक समिती बनवली होती. नागरिकत्व सुधारणा विधेयक ११ डिसेंबर २०१९ मध्ये संसदेत पारित करण्यात आले होते. त्यानंतर एका दिवसात राष्ट्रपतींनी या विधेयकावर स्वाक्षऱ्या केल्या होत्या. कायदा ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी भारतात स्थलांतरित झालेल्या हिंदू, शीख, जैन, ख्रिश्चन, बौद्ध आणि नागरिकांना नागरिकत्व प्रदान करण्यास सक्षम करतो.

### सांगलीचा पेहलवान ५०० गाड्या घेऊन मातोश्रीवर



मुंबई : महाराष्ट्रात कुस्तीचं मैदान गाजवल्यानंतर डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांनी आता राजकारणाच्या आखाड्यात उडी घेतली आहे. चंद्रहार पाटील यांनी आज हजारो समर्थकांसह मातोश्री या निवासस्थानी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. त्यानंतर खासदार संजय राऊत, उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत चंद्रहार पाटील यांना हातावर शिवबंधन बांधून पक्षप्रवेश दिला. उद्धव ठाकरेंनी शेतकऱ्यांच्या मुलाचा सन्मान केला आहे, अशी प्रतिक्रिया चंद्रहार पाटील यांनी पक्षप्रवेशानंतर दिली. यावेळी उद्धव ठाकरेंनी सांगलीतून लोकसभा निवडणुकीची उमेदवारी जाहीर केली आहे. काही दिवसांपूर्वी चंद्रहार पाटील यांनी मातोश्रीवर येऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली होती. महाविकास आघाडीमध्ये सांगली लोकसभा मतदारसंघ शिवसेना ठाकरे गटाला सुटल्यास चंद्रहार पाटील यांची शिवसेना ठाकरे गटाकडून उमेदवारी निश्चित मानली जात आहे. शेकडो गाड्यांच्या ताफ्यासह चंद्रहार पाटील आज मुंबईत दाखल झाले. पक्षप्रवेशावेळी मोठं शक्ती प्रदर्शन पाटील यांच्याकडून करण्यात आलं. तब्बल ५०० गाड्या त्यांच्या ताफ्यात होत्या.

## संपादकीय

# घडतंय बिघडतंय

आगामी लोकसभा निवडणूक येत्या काही दिवसांत जाहीर होण्याची शक्यता असतानाच देशातील दोन प्रमुख राजकीय आघाड्यांमध्ये मात्र 'घडतंय बिघडतंय' असे परस्परविरोधी वातावरण सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीबाबतीतही काही अनुकूल आणि काही प्रतिकूल गोष्टी घडताना दिसत आहेत. दुसरीकडे, काँग्रेसच्या पुढाकाराने आणि नेतृत्वाने स्थापन झालेल्या 'इंडिया' आघाडीमध्ये मात्र अद्यापही एकजिनसीपणा दिसत नाही. उलट संपणार्या प्रत्येक दिवसानंतर आघाडी बाबतीत काहीतरी नकारात्मक होतानाच दिसत आहे. गेल्या काही दिवसांत घडलेल्या विविध राजकीय घडामोडींवर नजर टाकली, तर एकसंध आघाडी म्हणून ही इंडिया आघाडी नरेंद्र मोदी यांच्या भाजप आघाडीला कसे तोंड देऊ शकेल याची शंका निर्माण होऊ शकते. इंडिया आघाडीच्या आजपर्यंतच्या बहुतेक सर्व मोठ्या बैठकीला हजर राहिलेल्या काश्मीरमधील पीडीएफ या पक्षाच्या नेता मेहबूबा मुफ्ती आणि नॅशनल कॉन्फरन्स या पक्षाचे नेते उमर अब्दुल्ला या दोघांनी जम्मू आणि काश्मीरमध्ये एकत्र न लढता स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतल्याने हा इंडिया आघाडीला मोठा धक्का आहे. काश्मीर या राज्यापुरती तरी इंडिया आघाडी अस्तित्वात नसणार आहे हे यावरून सिद्ध होत आहे. महाराष्ट्रासारख्या महत्त्वाच्या राज्यामध्येसुद्धा प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीमध्ये घ्यायचे की नाही याबाबत अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही. प्रकाश आंबेडकर दररोज पत्रकार परिषद घेऊन काँग्रेस, शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर टीका करत आहेत. प्रकाश आंबेडकर यांच्या आजपर्यंतच्या मागण्या बघता त्या मान्य करून त्यांना महाविकास आघाडीमध्ये म्हणजेच इंडिया आघाडीमध्ये स्थान दिले जाईल की नाही याबाबत शंका निर्माण होण्यासारखी परिस्थिती आहे. एकीकडे इंडिया आघाडीची परिस्थिती अशी असली तरी ऐन निवडणुकीच्या तोंडावर नवीन मित्र जमवत भाजपाच्या आघाडीने सकारात्मक वातावरण निर्मिती तयार केली आहे. भाजपचे एकेकाळचे मित्र पण काही कारणाने गेल्या काही कालावधीमध्ये दुरावलेले चंद्राबाबू नायडू यांच्या नेतृत्वाखालील तेलगू देशम पक्ष आणि जनसेना पक्ष हे आंध्र प्रदेशमधील दोन पक्ष एनडीएमध्ये सामील झाले असल्याने आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या दोन राज्यांमध्ये भाजप आघाडीची कामगिरी सुधारण्यास मदत होणार आहे. कोणत्याही लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाचे नेत्यांना नेहमीच दाक्षिणात्य राज्यातील कामगिरीबाबत चिंता असते. कारण या राज्यांमध्ये भाजपाला कधीच पाय रोवून उभे राहता आलेले नाही. याच पार्श्वभूमीवर कर्नाटकमध्ये देवेगौडा यांच्या जनता दलांबरोबर युती करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. भाजपने ओरिसामध्येसुद्धा बिजू जनता दलाबरोबर युती करण्याचे प्रयत्न सुरू ठेवले आहेत. २००० पूर्वी दीर्घकाळ बिजू जनता दल हे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा भाग होता. लोकसभा निवडणूक आणि विधानसभा निवडणूक भाजप आणि बिजू जनता दल एकत्रपणेच लढत होते. अर्थात काही वर्षांपूर्वी बिजू जनता दलाने जरी भाजपशी मैत्री तोडली असली तरी बिजू जनता दलाचे नेते नवीन पटनायक यांनी कधीही केंद्र सरकारवर किंवा नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केलेली नाही. या दृष्टिकोनातून पुन्हा एकदा नवीन पटनायक आपल्याकडे मैत्रीचा हात देतात का हे भाजपाला पहायचे होते; पण अद्याप याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. बिजू जनता दलाने सध्या तरी लोकसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. अर्थात, आगामी कालावधीमध्ये काहीही घडू शकते. इंडिया आघाडीबाबत बर्याच नकारात्मक गोष्टी घडत असताना त्यांनी बिहारमध्ये चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पक्षाला इंडिया आघाडीमध्ये सामील करून घेण्याबाबत हालचाली सुरू केल्या आहेत. अर्थात, चिराग पासवान काय निर्णय घेतात हे पाहणेसुद्धा महत्त्वाचे ठरणार आहे. मुळात इंडिया आघाडी असो किंवा राष्ट्रीय लोकशाही आघाडी असो या दोन्ही पक्षांचे घटक पक्ष जरी ठरले असले तरी आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये कोणी किती जागा लढवायच्या याबाबत मात्र अजूनही काही ठोस घडताना दिसत नसल्याने आगामी कालावधीमध्ये ही चर्चासुद्धा रंगताना दिसणार आहे. त्यावरून काही गोष्टी बिघडताना दिसणार आहेत. महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये जागावाटप करून उमेदवारांची संख्या ठरवणे हे एक जिकिरीचे काम होऊन बसणार आहे. आणखी सहा महिन्यांनी विधानसभा निवडणुकीला सामोरे जावे लागणार असल्याने त्याबाबत काही आश्वासने देऊन लोकसभा निवडणुकीमध्ये तडजोड करण्याची भूमिका घेण्याबाबत काही राजकीय पक्षांवर दबाव येऊ शकतो. त्यातूनच काही बिघडू शकते. कोणत्याही परिस्थितीमध्ये या निवडणुकीमध्ये भाजपला निवडून आणण्याचा चंग बांधलेली भाजप नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी एकीकडे आणि भाजपला सत्तेपासून रोखणे या जिद्दीने एकत्र येण्याचा प्रयत्न करणारी इंडिया आघाडी दुसरीकडे या दोघांसाठीही गेल्या काही दिवसांमध्ये काही घडत असले आणि काही बिघडत असले तरी दोन्ही गोष्टींचा थेट परिणाम निवडणुकीच्या निकालावर होणे अपरिहार्य आहे. येत्या कालावधीमध्ये आणखी काही नवे मैत्रीचे हात पुढे केले जातील. त्याचवेळी जे जुने मित्र आहेत ते नाराज होणार नाहीत याचीही काळजी घेतली जाईल. आगामी निवडणूक एवढी चुरशीची होणार आहे की एका जागेवरील विजय किंवा एका जागेवरील पराभवही महत्त्वाचा ठरणार आहे. आता लोकसभा निवडणुकीची घोषणा कोणत्याही क्षणी होण्याची शक्यता असल्याने दोन्ही बाजूंना जास्त दक्ष राहून काम करावे लागणार आहे. आघाड्यांमधील मतभेद किंवा जागा वाटपावरून निर्माण होणारी नाराजी ही मतदारांपासून लपून राहत नाही, ही गोष्ट लक्षात ठेवूनच निर्णय घ्यावे लागणार आहेत. महाराष्ट्रसारख्या राज्यात ज्या प्रकारे प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन विकास आघाडी आहे किंवा राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र नवनिर्माण सेना आहे असे अनेक पक्ष निवडणुकीच्या कालावधीमध्ये महत्त्वाचे ठरू शकतात. देशातील अनेक राज्यांमध्ये स्थानिक पातळीवरील असे प्रादेशिक पक्ष प्रभावीपणे कार्यरत आहेत आणि निवडणुकीमध्ये एखाद्या निवडणूक उमेदवाराला पाडणे किंवा त्याला निवडून आणण्याचे काम हे पक्ष अप्रत्यक्षपणे करू शकतात असेच आजपर्यंत सिद्ध झाले आहे. साहजिकच आगामी कालावधीमध्ये जे काही घडेल किंवा जे काही बिघडेल त्याचा आपल्या निवडणूक यशावर नकारात्मक परिणाम होणार नाही, याची खात्री सर्वच राजकीय आघाड्यांना करावी लागणार आहे.

# सातारा जिल्ह्यात दुष्काळ



**सातारा । वृत्तसेवा**

जिल्ह्यात गेल्यावर्षी कमी पर्जनम्यमान झाल्याने दुष्काळी स्थिती आहे. त्यामुळे शासनाने वाई आणि खंडाळा तालुक्याबरोबरच जिल्ह्यातील अनेक मंडलात दुष्काळ जाहीर केला. मात्र, अजुनही सवलती लागू होत नाहीत, असा आरोप करत स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आक्रमक पाऊल उचलले आहे. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना दिलास देण्याची मागणीही केली आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सातारा जिल्ह्यातील अनेक विभागांत गेल्यावर्षी कमी पाऊस पडल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. शासनाने फक्त दुष्काळ जाहीर करुन बोळवण केली. परंतु, कोणत्याही दुष्काळी सवलतीचा लाभ अथवा दिलासा शेतकऱ्यांना मिळालेला नाही. यासाठी सवलती तत्काळ लागू कराव्यात. त्याचबरोबर पाऊस कमी पडल्याने शेतीतून योग्य उत्पादन मिळाले नाही. चार प्रमुख पिके जिल्ह्यात होतात. यामधील कोणत्याही पिकाला सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे योग्य दरच मिळालेला नाही. दुधालाही भाव नसल्यामुळे शेतकरी अडचणीत आहे. अशा कारणाने संपूर्ण बाजारपेठ शांत आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातील अर्थचक्र थांबलेले आहे. राज्य शासनाने दुष्काळाची घोषणा केली. पण, आजपर्यंत कोणताही लाभ दिला नाही. यासाठी चार दिवसांत आढावा घेऊन सवलती लागू करण्याची गरज आहे. कर्ज पुनर्गठन व सर्व शेती कर्ज वसुलीस स्थगिती ही घोषणा निव्वळ धूळफेक आहे. यामुळे शेतकऱ्यांना कोणताही लाभ होत नाही. केंद्र शासनाने गेल्या अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांना कोणतीही दिलासा देणारी गोष्ट केलेली नाही. यापेक्षा कर्जमाफी पुनर्गठन असल्या फसव्या गोष्टी करण्यापेक्षा संपूर्ण वर्षाच्या कर्जावर व्याज माफ करुन त्याची अंमलबजावणी करण्याची गरज आहे. कृषी सवलत योजना लागू आहे. त्यात ४ टक्के व्याज परतावा केंद्र आणि राज्य शासन देत असते. याच योजनेचा विस्तार वाढवून दुष्काळी परिस्थिती म्हणून सर्वच कर्जांचे व्याज माफ करावे. शैक्षणिक शुल्क, परिक्षा शुल्क सवलत फक्त जाहीर झाली आहे. जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांनी सक्तीने शुल्क वसूल केले आहे. दुष्काळ जाहीर झाला आहे त्या विभागातील विद्यार्थी कुठेही शिक्षण घेत असेल तर त्यांना सवलत द्यावी. तसेच याबाबत प्रशासनाने खात्री करावी, अशीही आमची मागणी आहे. अन्यथा संबंधित संस्था आणि शाळांसमोर शुल्क वसूली आंदोलन टप्प्याटप्प्याने करण्यात येईल. शेती पंपाच्या विजबिलाबाबत संपूर्ण माफी मिळावी. कारण, शेतीसाठी ८ तास तोही कमी दाबाने वीजपुरवठा करुन शासन शेतकऱ्यांकडून २४ तासांचे विजबिल भरून घेत आहे. यातून अनेक वर्षे महाघोटाळा होत आहे. सामान्य शेतकऱ्यांना लुटले जात आहे. दुष्काळात कोणताही शेतकरी शेतीपंपाचे विजबिल भरणार नाही. वीजजोडणी तोडल्यास जशास तसे उत्तर देण्यात येईल. सातारा जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांचे ऊसबिल कायद्याप्रमाणे दिले नाही. ऊस दर नियंत्रण कायद्याचा भंग केला आहे. दुष्काळी परिस्थितीत अजून शेतकरी अडचणीत आणला जात आहे. अशा सर्व कारखान्यांवर कायदेशीर कारवाई करुन नियमाप्रमाणे १५ टक्के व्याजासह शेतकऱ्यांना ऊसबिल देण्यात यावे. दुष्काळी परिस्थितीमुळे धरणातील पाणीसाठा सत्तेचा गैरवापर करून काही नेतेमंडळी चोरी करुन नेत आहेत. नियमबाह्य पाणी नेणार्यावर तत्काळ कारवाई करावी, अशीही आमची मागणी आहे. शासनाने जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केला आहे. पण, सवलती लागू नाहीत. यामुळे शेतकऱ्यांना अडचणींना सामोर जावे लागत आहे. यासाठी प्रशासनाने सवलतीची तत्काळ अंमलबजावणी करुन दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. त्याचबरोबर याबाबत योग्य पध्दतीने नियोजन न केल्यास व निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांना त्रास झाल्यास अथवा कोणी आत्महत्या केल्यास याची जबाबदारी प्रशासनावर राहील. त्यामुळे मागण्यांची तत्काळ अंमलबजावणी करुन न्याय द्यावा.

## पुणे शहरात नवीन विस्तारित मेट्रो माग

पुणे – पुणेकरांसाठी आज एक अतिशय महत्त्वाचा आणि मोठा निर्णय झाला आहे. आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत पुणेकरांच्या अतिशय जिव्हाळ्याच्या अशा मेट्रोबाबत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे शहरात सध्या सुरू असलेल्या वनाज ते रामवाडी या मेट्रो मार्गाच्या विस्तारित मार्गांना मंजुरी देण्यात आली आहे. आम्ही आपणास सांगू इच्छितो की, सध्या स्थितीला वनाजी ते रामवाडी आणि पिंपरी चिंचवड महापालिका ते सिविल कोर्ट यादरम्यान मेट्रो वाहतूक सुरू आहे. विशेष म्हणजे सिव्हिल कोर्ट ते स्वारगेट यादरम्यानच्या मेट्रो मार्गाचे काम सध्या युद्ध पातळीवर सुरू असून आगामी काही महिन्यात हा देखील मार्ग वाहतुकीसाठी सुरू करण्याचे नियोजन महामेट्रोचे आहे. तसेच, सध्या सुरू असलेल्या मेट्रोला प्रवाशांकडून चांगला प्रतिसादही मिळत आहे. दरम्यान, आता वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली (विठ्ठलवाडी) या विस्तारित मेट्रो मार्गांना राज्य शासनाकडून हिरवा झेंडा दाखवण्यात आला आहे. यामुळे शहरातील मेट्रोचे जाळे आणखी सक्षम होईल आणि पुणेकरांना वाहतूक कोंडीतून दिलासा मिळणार अशी आशा आहे. पुणे महानगरपालिकेने महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून शासनाकडे हा प्रस्ताव सादर केला होता. दरम्यान याच प्रस्तावाला आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. हाती आलेल्या माहितीनुसार, वनाज ते चांदणी चौक हा १.१२ किलोमीटर लांबीचा मेट्रो मार्ग राहणार आहे. या मार्गिकेवर २ स्थानके तयार केली जाणार आहेत. तसेच, रामवाडी ते वाघोली (विठ्ठलवाडी) हा ११.६३ किलोमीटर लांबीचा मेट्रो मार्ग राहणार आहे. यावर ११ स्थानके तयार केली जाणार अशी माहिती समोर आली आहे.

## जाहीर प्रगटन

**बीड जिल्हयातील तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार नामे रोहिदास हरिभाऊ जाधव, रा. खडकपुरा, बीड, ता.जि.बीड यांनी दिलेल्या माहिती, सुचना व अधिकारावरून व दाखवलेल्या कागदपत्रावरून या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, गणेश बाबुराव रांजवण, रा. ओम निवास, शाहुनगर, बीड, ता.जि.बीड यांचे मालकी व ताब्यातील बीड नगर परिषद हद्दीचे आतील खडकपुरा, बीड येथील वार्ड ३ गट ५ ज्याचा न.प.बीड मालमत्ता क्र. जुना ३–५–२१४ व नवा ३–५–२५७ असा मिळालेला आहे. ज्याची चर्तु:सिमा खालीलप्रमाणे आहे. पुर्वेस – रामधन तांबडे यांचे घर, पश्चिमेस – बलभिम रकटे व फरताळे यांचे घर, दक्षिणेस – जगताप व सौदागर रकटे यांचे घर, उत्तरेस – १० फुटाचा रस्ता. येणेप्रमाणे वर नमूद चतुः सिमेतील मिळकत खरेदी करण्याचा व्यवहार आमच्या अशिलाने गणेश बाबुराव रांजवण यांचे सोबत केलेला असून त्यांनी आमचे पक्षकाराचे हक्कात ईसारपावती करून दिलेली आहे. तसेच सदर मिळकतीचे लवकरच नोंदणीकृत खरेदीखत करण्याचे ठरले आहे. सदरची मिळकत ही निर्विवाद असल्याचे गणेश बाबुराव रांजवण यांनी आमचे पक्षकाराला सांगितलेले आहे. तसेच आमचे पक्षकार किंवा ते सांगतील त्या व्यक्तींचे हक्कात नोंदणीकृत खरेदीखत करून देण्याचे ठरले आहे. तरी सर्व जनतेस जाहिरप्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, सदरील प्लॉट बाबत कोणत्याही व्यक्तीचे हितसंबंध वाटणी, गहाणखत, कर्ज व देवाण घेवाण, चोळीबांगडी, कोर्ट वाद अथवा इतर हक्क असेल तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय आर्थिक वित्त संस्थेचा कर्जबोजा असल्यास किंवा असल्याबाबतची माहिती असल्यास सबळ पुराव्यानिशी मुदतीत आक्षेप अथवा उजर आला नाही तर वर नमूद मिळकतीचे खरेदीखत आमचे अशिल करून घेतील त्यानंतर आलेला आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरून खरेदीखत करून घेण्यात येईल. करीता हे जाहिर प्रगटन.**

जाहिर प्रगटन देणार
रोहिदास हरिभाऊ जाधव
रा.खडकपुरा, बीड, ता.जि.बीड
मो.नं. ९२२६७९७८१९
मार्फत
ॲड.संजोत एस.महाजन,
बीड, मो.नं. ९७६२९१३३३३

जा.क्र.प्रशासन/अंतीम सभा/नोंदणी रद्द/प्रगटन/2024 दि.01.03.2024

## अंतीम सर्वसाधारण सभेचे जाहीर प्रगटन

खालील नमुद सहकारी संस्थांचे अवसायक यांच्याव्दारे या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळवू इच्छितात की, खालील सहकारी संस्थांचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 102 (2) अन्वये अवसायनाचे अंतिम आदेश यापूर्वीच निर्गमीत केलेले असून या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व सबंधितांना सुचना देण्यात येतात की, सदरील संस्थांच्या बाबतीत जर कोणाचे संस्थेकडे काही येणे देणे अथवा नोंदणी रद्द करण्यासंबंधी काही आक्षेप असतील तर त्यांनी तसेच संबंधीत संस्थेचे खाते ज्या बँकेत आहे त्या बँकेने येणे देणे व शिल्लकीची माहिती या कार्यालयास किंवा संबंधीत संस्थेच्या अवसायक यांचेकडे आक्षेप पुराव्यासह सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत अथवा सभेच्या दिवशी सादर करावेत. तसेच सदरील संस्थांचे रेकॉर्ड ज्यांच्याकडे उपलब्ध असेल त्यांनी संबंधीत संस्थेच्या अवसायकाकडे तात्काळ रेकॉर्ड द्यावे. संस्थेचे येणे देण्याची माहिती, नोंदणी रद्द करण्याचे आक्षेप उक्त मुदतीत अवसायकांकडे अथवा या कार्यालयास सादर करावेत. सदरचे आक्षेप विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास संस्थेचे /ऋणको/ किंवा धनको यांचे काही ही आक्षेप नाही असे गृहीत धरुन संस्था नोंदणी रद्द करण्या बाबतची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच अंतिम सर्वसाधारण सभेची हीच नोटीस समजून संस्थेच्या नावासमोर दर्शविलेल्या तारखेस व वेळेत उपनिबंधक, सहकारी संस्था ता.बीड यांचे कार्यालयात सर्व सभासदांनी विहीत वेळेत उपस्थित रहावे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | अवसायकाचे नाव | अंतीम सर्वसाधारण सभेचा दिनांक | सभेची वेळ |
|---|---|---|---|---|
| 1 | बीड जिल्हा शासकीय व निमशासकीय अपंग कर्मचारी सह पत मबीड | एस एल बेटकर | 25.03.2024 | 10.00 |
| 2 | बीड जिल्हा महिला विकास ना सहकारी पतसंस्था म.बीड | एस एल बेटकर | 25.03.2024 | 11.00 |
| 3 | बीड जिल्हा कोषागार कर्मचारी सहकारी संस्था म.बीड | एस एल बेटकर | 25.03.2024 | 12.00 |
| 4 | बीड जिल्हा सिंचन कर्मचारी पतसंस्था म.बीड | एस एल बेटकर | 25.03.2024 | 1.00 |
| 5 | ज्योतीबा औद्योगीक सहकारी संस्था म.वासनवाडी | एस एल बेटकर | 25.03.2024 | 2.00 |
| 6 | कामखेडा फलोत्पादन व खवि सहकारी संस्था म.कामखेडा | एस एल बेटकर | 25.03.2024 | 3.00 |
| 7 | शिवाजी गृहतारण सहकारी संस्था म.बीड | एस एल बेटकर | 25.03.2024 | 4.00 |
| 8 | स्वरसंगम गृहतारण सहकारी संस्था म.बीड | एस एल बेटकर | 26.03.2024 | 10.00 |
| 9 | आदर्श गृहतारण सहकारी संस्था म.बीड | एस एल बेटकर | 26.03.2024 | 11.00 |
| 10 | पदमावती गृहतारण सहकारी संस्था म.बीड | एस एल बेटकर | 26.03.2024 | 12.00 |
| 11 | त्रिरत्न मागा औद्योगीक सहकारी संस्था म.कुक्कडगाव | एस एल बेटकर | 26.03.2024 | 1.00 |
| 12 | संत रोहीदास मागा औद्यो सहकारी संस्था म.बीड | एस एल बेटकर | 26.03.2024 | 2.00 |
| 13 | श्रीकृष्ण हमाल कामगार औ सह संस्था म.तळेगाव | एस एल बेटकर | 26.03.2024 | 3.00 |
| 14 | ज्योतीबा को-ऑप ऑटोलूम इंड लि.वासनवाडी | एस एल बेटकर | 26.03.2024 | 4.00 |
| 15 | मराठवाडा औ मुद्रनालय सह स म.वासनवाडी | एस एल बेटकर | 26.03.2024 | 5.00 |
| 16 | आर्यन विद्युत कामगार औ सह संस्था म.बीड | एस एल बेटकर | 27.03.2024 | 10.00 |
| 17 | यांत्रिकी सेवकांची सहकारी पतसंस्था म.बीड | एस एल बेटकर | 27.03.2024 | 11.00 |
| 18 | बुवासाहेब बहुउद्देशिय सर्व सेवा सहकारी संस्था म.लोळदगाव | एस एल बेटकर | 27.03.2024 | 12.00 |
| 19 | माऊली महिला बहुउद्देशिय सर्व सेवा सहकारी संस्था म.साखरेबोरगाव | एस एल बेटकर | 27.03.2024 | 1.00 |
| 20 | अपूर्वा औद्योगीक सहकारी संस्था म.केतूरा | एस एल बेटकर | 27.03.2024 | 2.00 |
| 21 | महिला ग्राहक सेवा सहकारी संस्था म.बीड | एस एल बेटकर | 27.03.2024 | 3.00 |
| 22 | जोशाबा औद्योगीक उत्पादक सहकारी संस्था म.सात्रा | एस एल बेटकर | 27.03.2024 | 4.00 |
| 23 | नम्रता मजुर सहकारी संस्था म.हिंगणी बु | एस एल बेटकर | 27.03.2024 | 5.00 |
| 24 | संकल्प मा विविध वस्तु उत्पा औ सह संस्स्था म.वासनवाडी | एस एस सांगुळे | 25.03.2024 | 10.00 |
| 25 | जयहिंद बांधकाम साहीत्य माल पुरवठा सह सं म बीड | एस एस सांगुळे | 25.03.2024 | 11.00 |
| 26 | आदर्श मागासवर्गीय अँप्रेन्टीस सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था म.बीड | एस एस सांगुळे | 25.03.2024 | 12.00 |
| 27 | सोमेश्वर सुशिक्षित बेरोजगार कामगार सेवा सहकारी संस्था म.बीड | एस एस सांगुळे | 25.03.2024 | 1.00 |
| 28 | यश सुशिक्षित बेरोजगार कामगार सेवा सहकारी संस्था म.बीड | एस एस सांगुळे | 25.03.2024 | 2.00 |
| 29 | प्रगती सशिक्षित बेरोजगार बहुउद्देशिय सहकारी संस्था म.बीड | एस एस सांगुळे | 25.03.2024 | 3.00 |
| 30 | गौरव सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था म.बीड | एस एस सांगुळे | 25.03.2024 | 4.00 |
| 31 | जयभद्रा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था म.बीड | एस एस सांगुळे | 26.03.2024 | 10.00 |
| 32 | अजिंक्य सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकरी संस्था म.बीड | एस एस सांगुळे | 26.03.2024 | 11.00 |
| 33 | सागर विद्युत सशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था म.बीड | एस एस सांगुळे | 26.03.2024 | 12.00 |
| 34 | माऊली सुशिक्षित बेरोजगार तांत्रीक कामगार सेवा सहकारी संस्था म.संतनामदेव नगर बीड | एस एस सांगुळे | 26.03.2024 | 1.00 |
| 35 | श्री साईमाऊली सुशिक्षित बेरोजगार कामगार सेवा सहकारी संस्था म.रंजेगाव | एस एस सांगुळे | 26.03.2024 | 2.00 |
| 36 | तेजस इलेक्ट्रीशियन सुशिक्षित बेरोजगार स्वय: सेवा सहकारी संस्था म.घाटसावळी | एस एस सांगुळे | 26.03.2024 | 3.00 |
| 37 | राज सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था म.बीड | एस एस सांगुळे | 26.03.2024 | 4.00 |
| 38 | जयहिंद सुशिक्षित बेरोगार तांत्रीक सेवा सहकारी संस्था म.बीड | एस एस सांगुळे | 27.03.2024 | 10.00 |
| 39 | मोरया रासायनिक वि दुरुस्ती कामकारांची सह संस्था म.बीड | एस एस सांगुळे | 27.03.2024 | 11.00 |
| 40 | बीड जिल्हा सु बे सहकारी संस्थांचा संघ म.बीड | एस एस सांगुळे | 27.03.2024 | 12.00 |
| 41 | लुंबिनी मागासवर्गीय महिला औद्योगीक सहकारी संस्था म.नेकनुर | ए.टी.सानप | 25.03.2024 | 10.00 |
| 42 | दिग्वीजय बहुउद्देशिय सर्वा सेवा सहकारी संस्था म.शहाबाजपुर | ए.टी.सानप | 25.03.2024 | 11.00 |
| 43 | शिवराणा महिला नागरी सहकारी संस्था म.बीड | ए.टी.सानप | 25.03.2024 | 12.00 |
| 44 | विराज? अभिनव सर्व सेवा सहकारी संस्था म.नेकनुर | ए.टी.सानप | 25.03.2024 | 1.00 |
| 45 | छत्रपती शाहु महाराज मागासवर्गीय अभिनव सर्व सेवा सहकारी संस्था म.येळंबघाट | ए.टी.सानप | 25.03.2024 | 2.00 |
| 46 | महावीर अभिनव सर्व सेवा सहकारी संस्था म.बहीरवाडी | ए.टी.सानप | 25.03.2024 | 3.00 |
| 47 | वडजाई अभिनव सर्व सेवा सहकारी संस्था म.डोईफोडवाडी | ए.टी.सानप | 25.03.2024 | 4.00 |
| 48 | श्री व्यंकटेश अभिनव सर्व सेवा सहकारी संस्था म.वरवटी | ए.टी.सानप | 25.03.2024 | 5.00 |
| 49 | श्री गजानन अभिनव सर्व सेवा सहकारी संस्था म.किन्हीपाई | ए.टी.सानप | 26.03.2024 | 10.00 |
| 50 | संगमेश्वर अभिनव सर्व सेवा सहकारी संस्था म.कुर्ला | ए.टी.सानप | 26.03.2024 | 11.00 |
| 51 | बीड स्वच्छता मिशन ऑर्गनिक सहकारी संस्था म.बीड | ए.टी.सानप | 26.03.2024 | 12.00 |
| 52 | भालचंद्र अभिनव सर्व सेवा सहकारी संस्था म.लिंबागणेश | ए.टी.सानप | 26.03.2024 | 1.00 |
| 53 | राजाराम नाविन्यपुर्ण सर्व सेवा सहकारी संस्था म.बीड | ए.टी.सानप | 26.03.2024 | 2.00 |
| 54 | गजानन अभिनव कृषि निविष्ठा सर्वसाधारण सहकारी संस्था म.पांढऱ्याचीवाडी | ए.टी.सानप | 26.03.2024 | 3.00 |
| 55 | महिदा मायनॉरीटी गारमेंद इंड को-ऑप सोसायटी लि.बीड | एस बी जाधव | 25.03.2024 | 10.00 |
| 56 | मरीयम मायनॉरीटी गारमेंद इंड को-ऑप सोसायटी लि.बीड | एस बी जाधव | 25.03.2024 | 11.00 |
| 57 | तहुरा फातेमा अल्प सं औ सह संस्था म.बीड | एस बी जाधव | 25.03.2024 | 12.00 |
| 58 | लोकविकास सुशिक्षीत बेरोजगार सेवा सहकारी संस्था म.माळापुरी | एस.बी.जाधव | 25.03.2024 | 1.00 |
| 59 | श्री अथर्व तांत्रीक सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था म.बीड | एस.बी.जाधव | 25.03.2024 | 2.00 |
| 60 | साहीलराज सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था म.बीड | एस.बी.जाधव | 25.03.2024 | 3.00 |
| 61 | निलम सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था म.बीड | एस.बी.जाधव | 26.03.2024 | 10.00 |
| 62 | मातोश्री रमाई महिला सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था म.बीड | एस.बी.जाधव | 26.03.2024 | 11.00 |
| 63 | बीड एमएच सीएससी व्हीएसई को-ऑप सो लि.बीड | एस बी जाधव | 26.03.2024 | 12.00 |
| 64 | संविधान सम्राट मा बहू ग्रामोद्योग औद्योगीक वसाहत स स म नेकनूर | एस ए डावकर | 25.03.2024 | 10.00 |
| 65 | तुलसी मागा औद्योगीक सहकारी संस्था म.वासनवाडी | एस ए डावकर | 25.03.2024 | 11.00 |
| 66 | कर्मयोगी मागासवर्गीय महिला विविध वस्तू उत्पादक व पुरवठा औद्योगीक सहकारी संस्था म.बीड | एस.ए.डावकर | 25.03.2024 | 12.00 |
| 67 | जिवणधारा महीला औद्योगीक सहकारी संस्था म.बीड | एस.ए.डावकर | 25.03.2024 | 1.00 |
| 68 | अहींसा महीला औद्योगीक सहकारी संस्था म.आहेर धानोरा | एस.ए.डावकर | 25.03.2024 | 2.00 |
| 69 | सुप्रीया महीला औद्योगीक सहकारी संस्था म.बीड | एस.ए.डावकर | 25.03.2024 | 3.00 |
| 70 | जयदत्त मागासवर्गीय महीला औद्योगीक सहकारी संस्था म.बीड | एस.ए.डावकर | 26.03.2024 | 10.00 |
| 71 | गुरुगणेश बहुउद्देशिय सर्व सेवा सहकारी संस्था म.बीड | एस.ए.डावकर | 26.03.2024 | 11.00 |
| 72 | यांत्रीकी कामगार औद्योगीक सहकारी संस्था म.बीड | एस.ए.डावकर | 26.03.2024 | 12.00 |
| 73 | साधना पावर सर्व्हिसेस कामगार औद्योगीक सहकारी संस्था म.बीड | एस.ए.डावकर | 26.03.2024 | 1.00 |
| 74 | श्री गणेश विद्युत कामगार औद्योगीक सहकारी संस्था म.बीड | एस.ए.डावकर | 26.03.2024 | 2.00 |
| 75 | आम्रपाली मागा प्रोसेसिंग सह सं म.पाटोदा बे ता.बीड | एस ए डावकर | 26.03.2024 | 3.00 |
| 76 | भारत कामगार औद्योगीक सहकारी संस्था म.बीड | पी ए देशमुख | 25.03.2024 | 10.00 |
| 77 | आधार मागास औद्योगीक सहकारी संस्था म.बीड | पी ए देशमुख | 25.03.2024 | 11.00 |

एस.एल.बेटकर
एस.ए.डावकार
ए.टी.सानप

एस.ए.सांगुळे
एस.बी.जाधव
पी.ए.देशमुख

## अभ्यासाला कायमची सुट्टी

मुंबई – आता घरच्या अभ्यासाला म्हणजे राज्यातील शाळेतील विद्यार्थ्यांच्या गृहपाठाला कायमची सुट्टी होण्याबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी गृहपाठा बाबत आपले मत व्यक्त केलं आहे. दोन वर्षांपूर्वी राज्याच्या शालेय शिक्षण मंत्र्यांनी पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा गृहपाठ बंद करण्याचा इशारा देण्यात आला होता. या बाबतीत शिक्षण तज्ज्ञांशी चर्चा करून निर्णय घेतला जाणार असे सांगितले होते. मात्र या बाबत अद्याप निर्णय झाला नाही. लोणावळा येथे एका शिक्षक संमेलनाच्या कार्यक्रमात बोलताना राज्यपाल बैस म्हणाले. जगातील अनेक राष्ट्रात मुलांना गृहपाठ दिले जात नाही. आपण देखील हे धोरण अवलंबवायला हवं. शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून शाळेतच अभ्यास करून घ्यावा.क्षेत्र भेट, उद्यान भेट, गडकिल्ले, नदी, वारसा स्थळ असे काही उपक्रम राबवून मुलांच्या सर्वांगीण विकासावर भर दिले पाहिजे. मुलाना मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक गॅजेट पासून दूर करण्याची गरज आहे. त्यासाठी पालकांना प्रयत्न करावे लागतील. मुलांचा विकास समूहामध्ये होतो. त्यांच्यात एकत्रित पणामुळे पुढे जाण्याची भावना निर्माण होते. खेळामुळे त्यांच्यात विजय आणि पराभवाची भावना निर्माण होते. शिक्षकांनी आपल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा बारकाईने अभ्यास करण्याची गरज आहे देशाच्या आत्मनिर्भरते साठी विद्यार्थ्यांनी सक्षम होण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांनी आवश्यक कौशल संपादन करावे या साठी शैक्षणिक प्रक्रियेत बदल करावे लागतील .या साठी त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करावा असे राज्यपाल म्हणाले.

## स्वाभिमानासाठी एकजुटीने लढू

पिंपरी : आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील सर्व राजकीय पक्ष आणि संघटना यांच्या प्रमुख पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्त्यांची समन्वय बैठक पिंपरी चिंचवडमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) संपर्क नेते तथा आमदार सचिन अहिर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी, तसेच देशातील लोकशाहीच्या रक्षणासाठी एकजुटीने लढू आणि मावळ लोकसभेतून महाविकास आघाडीचाच खासदार दिल्लीत पाठवू, असा निर्धार यावेळी सर्वांनी केला.

## राज्यात उन्हाची तीव्रता वाढणार

मुंबई – राज्यात उन्हाळ्याचे तापमान ०.२५ ते ०.४२ अंशाने वाढण्याचा व बहुतेक जिल्ह्याचे तापमानप्रदूषणाच्या कमी–अधिक प्रमाणात १ ते २ अंशाने वाढू शकते, असा इशारा सेंटर फॉर सायन्स, टेक्नालेंजी ॲण्ड पॉलिसी या संस्थेने दिला आहे. हिवाळ्यात ०.३ ते ०.५५ अंशाने वाढ होण्याची शक्यता आहे. प्रदूषण वाढीमुळे २०५० पर्यंत जागतिक तापमानवाढ दीड नाही, तर ३ अंशांनी वाढण्याचा इशारा इंटरगव्हर्नमेंटल पॅनल फॉर क्लायमेट चेंज (आयपीसीसी) ने आधीच दिला आहे. २०३० पर्यंत होणारी १ ते १.५ अंश तापमानवाढ २०२३ मध्येच गाठली आहे. भारत हवामान जोखीम निर्देशांकात ७ व्या आणि नैसर्गिक आपत्ती निर्देशांकात ३ या क्रमांकावर आहे. भारतीय हवामान विभागाची आकडेवारी व कॉर्डेक्स (कोऑर्डिनेटेड रिजनल क्लायमेट डाउनस्केलिंग एक्सपेरिमेंट) मॉडेलच्या माध्यमातून प्रदूषणाच्या कमी व अधिक तापमान वाढण्याचा इशारा देण्यात आला आहे.


## महाराष्ट्रात उभारणार आधुनिक सायबर लॅब



नवी मुंबई – पोलीस मुख्यालयात मद्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्ष उभारण्यात आला. या कक्षात मुद्देमाल कक्ष ,रेकॉर्ड कक्ष, ई पेरवी कक्ष स्थापन करण्यात आलंय. यामुळे न्यायालयात सादर करण्यात येणारे पुरावे सुस्थितीत ठेवण्यात येणार आहे. यावेळी नवी मुंबई मध्ये देशातील आधुनिक सायबर लॅब उभारण्यात येणार असल्याची घोषणा केली. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने सुरू करण्यात आलेले मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्ष हे नवीन पध्दतीचं केंद्र आहे. महाराष्ट्रातले पहिले केंद्र असून पथदर्शी प्रकल्प आहे. यापुढे राज्यातल्या सर्व युनिटमध्ये असं केंद्र काढावं लागणार आहे. सर्व संहिता अनुरूप देशातलं पहिलं आयुक्तालय तयार झालं आहे. सर्व युनिट आणि सर्व आयुक्तालय अशीच तयार व्हावीत. राज्यातला आधुनिक सायबर प्रोजेक्ट हाती घेतला आहे. भविष्यात डिजिटल ट्रान्झिशन वाढत आहेत त्यामध्ये चीनला मागे टाकलं आहे. त्यामुळे सायबर गुन्हे रोखण्यासाठी नवी मुंबईत देशातली आधुनिक सायबर लॅब उभारण्यात येणार आहे .

# लोकसभा निवडणुकीच्या मैदानात ठाकरेंची आघाडी

**मुंबई । वृत्तसेवा**



लोकसभा निवडणूक २०२४ आता अवघ्या दिवसांवर येऊन ठेपली आहे. निवडणूक आयोग कधीही तारखांची घोषणा करून आचारसंहिता लावू शकतं. लोकसभा निवडणुका तोंडावर आलेल्या असल्या तरी महाराष्ट्रात महायुती किंवा महाविकासआघाडीकडून उमेदवारांची घोषणा करण्यात आलेली नाही. भाजपने देशभरातली पहिली यादी जाहीर केली असली तरी यात महाराष्ट्रातल्या एकाही उमेदवाराचा समावेश नाही. महायुती आणि महाविकासआघाडीच्या जागावाटपाच्या चर्चा सुरू असल्या तरी उद्धव ठाकरेंनी आघाडी घेतली आहे. शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाने आतापर्यंत पाच उमेदवारांची तर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने एका उमेदवाराची घोषणा केली आहे. भोरच्या मेळाव्यात शरद पवारांनी सुप्रिया सुळे बारामती लढवतील, असं सांगितलं. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी बारामतीतून अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार रिंगणात उतरणार असल्याचं स्पष्ट केलं. महायुतीमधून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राहुल शेवाळे मुंबई दक्षिण–मध्य मधून रिंगणात उतरतील, याचे संकेत जाहीर भाषणातून दिले. दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्या पक्षाने आतापर्यंत ५ उमेदवारांची नावं जाहीर कार्यक्रमातूनच सांगितली आहेत. रायगडमधून अनंत गिते, मावळमधून संजोग वाघेरे, मुंबई उत्तर–पश्चिममधून अमोल किर्तीकर रिंगणात उतरतील, याची घोषणाच उद्धव ठाकरेंनी जाहीर कार्यक्रमातून केली. तर ठाण्यातून राजन विचारे उमेदवार असतील असं आदित्य ठाकरेंनी ठाण्यातल्या कार्यक्रमात जाहीर करून टाकलं. डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांनी मातोश्रीवर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. या प्रवेशानंतर उद्धव ठाकरेंनी चंद्रहार पाटील यांना सांगलीतून दिल्लीला पाठवण्याचं वक्तव्य केलं. गदा आणि मशाल घेऊन दिल्लीला पाठवायचं आहे, आपल्याला हा एक मर्द दिल्लीला पाठवायचा आहे. लोकसभा संघटकपदी चंद्रहार पाटील यांची निवड करतोय, त्यामुळे त्यांची वाट अधिक सोपी होईल, असं उद्धव ठाकरे म्हणाले. दरम्यान उद्धव ठाकरे यांनी मुंबई उत्तर–पश्चिममधून अमोल किर्तीकर यांची उमेदवारी जाहीर केल्यामुळे काँग्रेस नेते संजय निरुपम यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली. या जागेवरून निवडणूक लढण्यासाठी संजय निरुपम इच्छुक आहेत.

# लातूर जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नात साडेसहा कोटी रुपयांची वाढ

**लातूर । वृत्तसेवा**




शासनाकडून मिळणाऱ्या निधीची प्रशासकांनी बँकेत योग्य पध्दतीने गुंतवणूक केल्याने व्याजाच्या माध्यमातून जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नात जवळपास दुपटीने वाढ झाली आहे. त्यामुळे आता जिल्हा परिषदेस व्याजातून १३ कोटी ६७ लाख रुपये मिळत आहेत. लेखा व वित्त विभागाच्या सुयोग्य नियोजनामुळे ही वाढ झाली असल्याचे पहावयास मिळत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील विकास कामांना अधिक प्रमाणात निधी मिळणार आहे. मिनी मंत्रालय असलेल्या जिल्हा परिषदेस विविध योजना, विकास कामांसाठी केंद्र सरकार, राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी मिळतो. त्याचबरोबर जिल्हा नियोजन समितीकडूनही स्थानिक विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. जिल्हा परिषदेतील पंचायत, आरोग्य, बांधकाम, महिला व बालकल्याण, समाजकल्याण, लघु पाटबंधारे, शिक्षण, कृषी व पशुसंवर्धन, सामान्य प्रशासन अशा विविध विभागांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला. जिल्हा नियोजन समितीकडून उपलब्ध निधीचा वापर जिल्हा परिषदेस दोन वर्षे करता येतो. शासन व जिल्हा नियोजन समितीकडून उपलब्ध निधीचा तात्काळ वापर होत नाही. तो जिल्हा परिषदेच्या बँक खात्यावर पडून राहतो. योजना अथवा विकास कामे पूर्ण झाल्यानंतर तपासणीनंतर बिल अदा करण्यात येते. त्यास काही महिन्यांचा कालावधी लागतो. या बाबी बारकाईने तपासून जिल्हा परिषदेच्या लेखा व वित्त विभागाने तात्पुरत्या स्वरुपात बँकेत जिल्हा परिषदेच्या नावावर १२० कोटींची गुंतवणूक केली आहे. त्यामुळे व्याजाचे उत्पन्न वाढले आहे. जिल्हा परिषदेच्या विविध विभागांचे आणि पंचायत समित्यांचे विविध बँकेत खाते आहेत. त्यावर काही रक्कम पडून होती. लेखा व वित्त विभागाने सर्व खात्यांची आणि रकमेची माहिती घेतली. तेव्हा बरीच रक्कम वापराविना नियमित खात्यावर असल्याचे दिसून आले. त्यामुळे अनावश्यक खाते बंद करुन ती रक्कम वापराच्या खात्यावर वर्ग करुन घेतली. बँक खात्याचे एकत्रीकरण केले आहे. गेल्या वर्षी जिल्हा परिषदेस व्याजातून ७ कोटी ३२ लाख रुपयांचे व्याज मिळाले होते. खाते एकत्रिकरणामुळे यंदा त्यात ६ कोटी ५० लाखांची भर पडली असून आता १३ कोटी ६७ लाख रुपये व्याज मिळत आहे. या रकमेचा लाभ जिल्ह्यातील विकास कामांसाठी होणार आहे. जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या बँक खात्यावर निधी पडून असल्याचे तपासणीत आढळले. त्यामुळे बँक खात्यांचे एकत्रिकरण केले. खात्यावरील निधीची बँकेत जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या नावाने गुंतवणूक केली. त्यामुळे व्याजाच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. आता १३ कोटी ६७ लाख रुपये व्याजरुपाने उत्पन्न मिळणार आहे.

## शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्र्वासित प्रगती योजनेचा लाभ

**पुणे । वृत्तसेवा**

राज्यातील खासगी मान्यताप्राप्त शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही २४ वर्षानंतरचा आश्र्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यासाठी मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यासाठी ५३ कोटी ८६ लाख रुपये खर्चास शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून आश्र्वासित प्रगती योजनेच्या मागणीसाठी आंदोलन उभे करणाऱ्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर महामंडळाच्या १८ वर्षांच्या लढ्याला यश मिळाले आहे, अशी माहिती शिक्षकेतर महामंडळाचे राज्य सरकार्यवाह शिवाजी खांडेकर यांनी दिली. राज्यातील खासगी मान्यताप्राप्त शाळांमधील कर्मचारी यांना पदोन्नतीची संधी मिळत नाही. आश्र्वासित प्रगती योजनेच्या माध्यमातून कर्मचारी यांना पदोन्नतीची वेतनश्रेणी मिळणार आहे. २४ वर्षाची सेवा पुर्ण कर्मचाऱ्यांना आश्र्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळावा अशी मागणी अनेक वर्ष शिक्षकेतर महामंडळाच्या माध्यमातून शासनाकडे करण्यात येत होती. त्यासाठी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अनेक वेळा संघर्षाची भूमिका घेतली होती. सर्वच शिक्षक तसेच पदवीधर आमदार यांच्या नेतृत्वाखाली राज्य शिक्षकेतर महामंडळाने अनेक आंदोलने केली होती. नुकत्याच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा शिक्षकेतर कर्मचारी संघटनांच्या महामंडळाच्या ५१ व्या राज्यव्यापी अधिवेशनात याच प्रश्नावर प्रामुख्याने विचार विनिमय करण्यात आला होता. त्यास सकारात्मक प्रतिसाद देत अर्थमंत्री यांच्याशी बोलून प्रश्न मार्गी लावला जाईल, असे आश्वासन शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिले होते. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मागणी अखेर मार्गी लागली आहे. लवकरच याबाबत शासन निर्णयही जारी होणार आहे. त्यानंतर त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत महामंडळ प्रयत्नशील असल्याचे शिवाजी खांडेकर यांनी सांगितले. १ जानेवारी २०२४ रोजी सेवेत असलेल्या व यापुर्वी सेवेत २४ वर्षे पूर्ण झालेल्या कर्मचारी यांना प्रत्यक्ष योजनेचा लाभ मिळणार आहे.

# प्रकल्पांना गती देणारा खासदार हवा

शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये नागरिकशास्त्राचा अभ्यास करताना लोकसभा, विधानसभा आणि महापालिका यांचे अधिकार आणि कर्तव्ये बहुतेक सर्व जण शिकलेले असतात. या प्रतिनिधी मंडळांमध्ये काम करणारे खासदार, आमदार आणि नगरसेवक यांच्याकडून कोणती कामे अपेक्षित असतात, हे सुद्धा आपल्याला माहिती असते. दुर्दैवाने, निवडणुकीच्या रणधुमाळीत खासदाराकडून स्थानिक स्तरावरील नगरसेवकांकडून केली जाणारी कामे आणि नगरसेवकांकडून खासदाराच्या अखत्यारित येणाऱ्या कामांची जाहिरातबाजी राजकीय पक्षांकडून केली जाते. मतदार म्हणून आपण त्यावर विश्वास ठेवतो आणि खरे तर फसतोच. खासदाराच्या विकास निधीतून आपल्या परिसरातील एखाद्या व्यायामशाळेचे (ओपन जिम) उद्घाटन, एखाद्या वाचनालयाचे नूतनीकरण, रस्त्यावर सार्वजनिक स्वच्छतागृहांचे बांधकाम अथवा बसथांबे बांधून दिले, की 'खासदार खरेच कामाचा आहे,' अशी भावना होत असेल, तर नागरिकशास्त्राचे पुस्तक पुन्हा अभ्यासायला हवे. कायदेमंडळ म्हणून देशासाठी एखादे धोरण निश्चित करण्यात खासदाराचा सहभाग असतोच. तो सत्ताधारी पक्षाऐवजी विरोधी पक्षात असला, तरी उपयुक्त सूचना करणे खासदाराच्या हाती असतेच. त्याचवेळी केंद्र सरकारकडून जाहीर केल्या जाणाऱ्या विविध योजनांमधून आपल्या मतदारसंघातील विकासकामांना गती देणे अथवा मतदारसंघातील केंद्रीय स्तरावरच्या प्रलंबित कामांसाठी संबंधित मंत्री किंवा मंत्रालयाच्या कामातून निधी मिळविणे, यासाठी दिल्लीत पाठपुरावा केला जाणे अपेक्षित आहे. एखाद्या योजनेसाठी राज्य सरकारची मदत लागते. अशावेळी संबंधित खासदाराने राज्य सरकारच्या माध्यमातून संबंधित योजना अथवा त्याद्वारे उपलब्ध होणारा निधी लवकर प्राप्त व्हावा, याची जबाबदारी घ्यायला हवी. देशभराच्या विविध भागांतील खासदार त्यासाठी प्रयत्न करताना दिसतात. पहिल्यांदाच निवडून जाणाऱ्या एखाद्या खासदाराला कदाचित पहिल्या दोन–तीन वर्षांत विविध योजनांसाठी निधी मिळविण्यात अथवा मंत्री–मंत्रालयातील अधिकारी यांच्याशी थेट संपर्क नसल्याने पाठपुरावा करण्यात अडचणी निश्चित येऊ शकतात. मात्र, त्याचसाठी संसद अधिवेशनाच्या कालावधीशिवाय दिल्लीत तळ ठोकून राहणे, पक्षाच्या माध्यमातून अथवा काही वरिष्ठ सहकाऱ्यांचे मार्गदर्शन घेऊन मतदारसंघातील योजनांच्या प्रगतीचा आढावा घेणे, काही अडचणी असल्यास त्या सोडविणे; अन्यथा थेट संसदेमध्येच प्रश्नोत्तरे, चर्चा या माध्यमातून आवाज उठविणे, अशा विविध माध्यमांतून मतदारसंघातील विकासकामांना गती देता येऊ शकते. या पद्धतीने काम करणाऱ्या खासदारांची संख्या काही कमी नाही. त्यासाठी फक्त राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. न. वि. गाडगीळ, इंदिरा मायदेव, ना. ग. गोरे, शंकरराव मोरे, एस. एम. जोशी, मोहन धारिया, विठ्ठलराव गाडगीळ या सर्वांनी स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या ३५–४० वर्षांमध्ये पुण्याचे प्रतिनिधीत्त्व संसदेत केले आहे. खासदार म्हणून ओळख होण्याआधीच यातील बहुतांश नावांचा देशभरात दबदबा होता. यातील काहींनी केंद्रीय मंत्रिमंडळासह इतर महत्त्वाच्या घटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळल्या. त्यानंतरच्या काळात सुरेश कलमाडी हे नावही दिल्लीतील बहुतेकांच्या परिचयाचे होते. केंद्रीय मंत्री आणि ऑलिम्पिक असोसिएशनच्या माध्यमातून दिल्लीतील वरिष्ठ पातळीवरच्या नेत्यांशी कलमाडी यांचे चांगले संबंध असल्याचा फायदा पुण्याला निश्चित झाला आहे, यात शंकाच नाही. अण्णा जोशी, विठ्ठल तुपे, प्रदीप रावत, अनिल शिरोळे आणि दिवंगत खासदार गिरीश बापट यांनी त्यांच्या काळात पुण्यासाठी विविध योजनांद्वारे निधी मिळविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यापैकी अण्णा जोशी आणि विठ्ठल तुपे हे विरोधी पक्षाचे खासदार असल्याने त्यांना सत्ताधारी पक्षाच्या खासदारांच्या तुलनेत विविध योजना किंवा प्रकल्पांसाठी पुढाकार घेण्यात मर्यादा होत्या. राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाची संधी पुण्याला मिळाल्याने केंद्र सरकारच्या निधीतून पुण्यात रस्त्यांची खूप कामे २००७च्या दरम्यान झाली. त्यानंतरच्या गेल्या १५ वर्षांमध्ये पुणे मेट्रो प्रकल्प आणि लोहगाव येथील टर्मिनलचे विस्तारीकरण या दोन प्रकल्पांचा अपवाद वगळता पुण्यामध्ये केंद्राच्या योजनेतून भरीव कामे झाल्याचे दिसून येत नाही. मुळा–मुळा नदी शुद्धिकरण प्रकल्पासाठी केंद्र सरकारने अनुदान दिले असले, तरी दोन खासदारांच्या पूर्ण टर्म संपूनही हे काम अजूनही पूर्णत्त्वास गेलेले नाही. देशात सर्वाधिक गाजावाजा झालेल्या 'स्मार्ट सिटी' योजनेत पुणे दुसऱ्या क्रमांकावर होते. त्यात ठरविलेली किती कामे पूर्ण झाली, याचा आढावा खासदारांनी घ्यायचा नाही तर कोणी? केंद्रीय स्तरावर अडकलेले पुण्याशी संबंधित इतरही महत्त्वाचे प्रकल्प आणि योजनांना अपेक्षित गती मिळालेली नाही. खासदार म्हणून विविध राजकीय पक्षांकडून पुढील महिन्यात उमेदवारांची घोषणा होईल. त्यांचा प्रचार सुरू होईल. या प्रचारादरम्यान त्यांच्या पुण्याच्या जाहीरनाम्यात दिल्लीतील कोणत्या प्रकल्पांचा समावेश आहे, हे जरूर तपासा. पुण्याचा खासदार होऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराचा पाच वर्षांचा प्राधान्यक्रम काय असेल? हे विचारण्याचे धाडस पुणेकरांनी दाखवायला हवे आहे. महापालिका आणि राज्य सरकारकडून होणाऱ्या कामांचे आश्वासन तुमचा खासदारकीसाठी उभा राहणारा उमेदवार देणार असेल, तर त्यालाही तुम्ही नागरिकशास्त्राचे पुस्तक भेट देत, त्याच्या कर्तव्यांची जाणीव करून देऊ शकता. पुणे आणि परिसरातील वाढते नागरीकरण, वाढती लोकसंख्या, उद्योग–सेवा व्यवसायांचे निर्माण होणारे जाळे, या परिसरातून केंद्र सरकारच्या तिजोरीत जमा होणार महसूल आणि त्या तुलनेत पुण्यासाठी केंद्र सरकारच्या विविध योजनांसाठी मिळणारा निधी, याचा ताळमेळ साधला जायला हवा. उदाहरणार्थ, पुण्यातून १०० रुपयांचा कर सरकारी तिजोरीत जमा होत असेल, तर अगदी पूर्ण १०० रुपयांची नाही; पण किमान ५० रुपयांची कामे तरी पुणे आणि परिसरात होतात का? यावर पुणेकर मतदारांनी लक्ष ठेवण्याची गरज आहे. राजकीय पक्ष कोणताही असो; पण २० लाख लोकांचे प्रतिनिधीत्त्व करणाऱ्या खासदाराने मतदारांप्रती उत्तरदायी असलेच पाहिजे. नागरिकांमधून निवडून जाणाऱ्या लोकसभेच्या खासदारांप्रमाणे एखाद्या शहराचे, परिसराचे प्रतिनिधीत्त्व करणाऱ्या राज्यसभेच्या खासदारांकडून स्थानिक विकास कामे आणि प्रकल्पांच्या पूर्ततेसाठी पाठपुरावा–प्राधान्य दिले गेले पाहिजे. राज्यसभेवर पुण्यातील दोन खासदारांनी सलग १२ वर्षे प्रतिनिधीत्त्व केले आहे आणि आता मेधा कुलकर्णी यांच्या निवडीमुळे लोकसभेतील जिल्ह्याच्या चार खासदारांसह पुण्याचा आणखी एक खासदार संसदेत पुण्याचे प्रश्न–समस्या मांडू शकणार आहे. पुणे शहर, पिंपरी–चिंचवड, पुणे महानगर आणि पुणे जिल्हा अशा क्रमाने मांडणी केल्यास जवळपास एक ते सव्वा कोटी जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सर्वच खासदारांनी एकत्रितपणे शहराच्या विकासाकरिता योगदान देणे महत्त्वाचे ठरणार आहे. देशाच्या अनेक भागांत अनेक प्रकल्प गतीने पुढे सरकत असताना पुणे परिसरात अनेक प्रकल्पांना अचानक 'स्पीडब्रेकर' लागतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी 'विकसित भारता'कडे वाटचाल करण्याचे स्वप्न सातत्याने दाखवत असताना, त्यात पुणे परिसर विविध प्रश्न–समस्यांच्या जंजाळात अविकसित राहून कसे चालेल? त्यासाठी, सर्वंकष विचार करून दूरदृष्टीने पुण्याच्या विविध प्रकल्पांना केंद्रीय स्तरावरून चालना देण्याचे काम करणारा खासदार हीच पुण्याची आजची गरज आहे.

## अन्नत्याग आंदोलनात अनेकांचा होणार सहभाग

अंबाजोगाई - आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक मान्यवर उपवास/अन्नत्याग करणार आहेत. अशी माहिती किसान पुत्र आंदोलनाचे नेते अमर हबीब यांनी दिली. प्रसिद्ध समाजसेवक अभय बंग (वर्धा), अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व निवृत्त सनदी अधिकारी लक्ष्मीकांत देशमुख (पुणे), प्रख्यात समाजसेवक आणि लेखक हेरंब कुलकर्णी (अहमदनगर), निवृत्त अधिकारी पुरुषोत्तम गावंडे (अकोला), विख्यात गजलकार गजानन वाघमारे (महागाव), संवेदनशील कवयित्री अंजली कुलकर्णी (पुणे), आदिवासींच्या आरोग्यासाठी कार्य करणारे डॉ. सतीश गोगुलवार (गडचिरोली), भारत-पाक मैत्री संघाचे, पत्रकार जातीन देसाई (मुंबई), नामवंत साहित्यिक प्रा. डॉ. मारोती कसाब (उदगीर), सुप्रसिद्ध रिडिओलॉजिस्ट डॉ. आशिष लोहे (अमरावती) यांच्या सह राज्याच्या वेगवेगळ्या भागातील अनेक मान्यवर अन्नत्याग आंदोलनात भाग घेत आहेत. परभणी जिल्ह्यातील दैठणा येथून निघून पाथरी येथे सांगता होणारी पदयात्रा सुभाष कच्छवे व त्यांचे सहकारी काढीत आहेत. समारोप कार्यक्रमात प्रसिद्ध कवी इंद्रजीत भालेराव हे मार्गदर्शन करणार आहेत.

## गटार नाटकाचा जबरदस्त प्रयोग



बीड - बहुजन रंगभूमी, नागपूर द्वारा आयोजित,वीरेंद्र गणवीर द्वारा लिखित-दिग्दर्शित 'गटार' नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या उदघाटक डॉ. दीपाताई क्षीरसागर, अध्यक्ष अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा, बीड तर पूजा वाघमारे, नगरसेवक ह्यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटनपर मार्गदर्शन करताना डॉ. दिपाताई यांनी आंबेडकरी जलसे ते दलित रंगभूमी ह्याचा सविस्तर इतिहास मांडला. नाटक हे मनोरंजन आणि प्रबोधनाचे उत्कृष्ट माध्यम आहे, त्यातून सामाजिक जाण आणि भान ठेवून, वेदनांची क्रांती करण्याचं काम, बहुजन रंगभूमी करते असे सांगून ह्याच क्रांतिभूमी नागपूरचं नाटक बीड ला होतेय आणि त्यातही ८७ वा प्रयोग म्हणून पूर्ण टीमला शुभेच्छा दिल्या. प्रो. दुष्यंता रामटेके यांनी सद्यस्थितीतील बहुजन रंगभूमीवर प्रकाश टाकला. गटार नाटकाचा जबरदस्त प्रयोग नागसेन बुध्दविहारात सादर झाला.

## तुलसी इंग्लिश स्कूल येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



बीड - तुलसी इंग्लिश स्कूल ,बीड येथील विद्यार्थिनींनी आणि शिक्षिकांसाठी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि.९ मार्च रोजी फॅशन शो चे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून देवगिरी प्रतिष्ठानच्या प्रशासकीय अधिकारी डॉ.अस्मिता साळवे, प्राचार्य उमा जगतकर यांची उपस्थिती होती. नर्सरी ते वर्ग नववी मधील विद्यार्थिनींनी भारतातील आदर्श महिला, प्रथम महिला तसेच विविध विविध क्षेत्रातील महिला यांचे सादरीकरण करत उपस्थितांचे लक्ष वेधले होते.तसेच शिक्षीकांनाही विविध कलागुणांचे सादरीकरण केले. यामध्ये बालवाडी वर्गातून जानवी जोगदंड, रायबा फरोकी, आणि वीरा राठोड, बागबान अरफा वैशाखी वाघमारे उन्नती वडमारे,प्रज्ञा श्रुतिका सगळे,धनश्री धनवे (नर्सरी,ड्घऋ,णघऋ) ,अनघा काळे, जान्हवी पोठभरे( प्राथमिक गट), धनश्री वोव्हाळ,आर्या जावळे,(माध्यमिक गट ) तर शिक्षकांमधून सौ. वर्षा जावळे, ऋषाली लोखंडे ,आणि सानिया शेख यांनी अनुक्रमे प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविला.या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह शिक्षिका कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

asianpaints
रूद्र कलर होम
आमच्याकडे सर्व प्रकारचे वॉटर कलर,सिमेंट कलर मिळतील.
प्रो.प्रा. वाघीरे
9146702323
8149800020
पत्ता : राष्ट्रवादी भवनसमोर, बार्शी रोड,बीड

# महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे आंतरराष्ट्रीय दर्जाची व्हावीत -मुंडे

**परळी । प्रतिनिधी**



कृषी विद्यापीठांनी शिक्षण आणि संशोधनात भरीव कामगिरी करावी. यासाठी आवश्यक निधी शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येईल. सर्व विद्यापीठे आंतरराष्ट्रीय दर्जाची होण्यासाठी विद्यापीठांच्या कुलगुरूंनी प्रयत्न करावेत, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले. महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेची ११४ वी बैठक आज कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणाली द्वारे पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. परदेशातील विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी सर्व महाविद्यालयातील इमारती, वसतिगृह आणि प्रयोगशाळा समवेत इतर पायाभूत सोयी सुविधा देखील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या असाव्यात अशीही सूचना यावेळी कृषिमंत्री मुंडे यांनी केली. या बैठकीमध्ये अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये एकूण १४३ विषयांवर चर्चा झाल. शिक्षण विभागाचे एकूण १५ विषय , संशोधन विभागाचे ६ विषय, साधनसामग्री विकास विषयाची १११ विषय, प्रशासन शाखेचे ४, वित्त शाखेचा १ आणि सेवा प्रवेश मंडळाच्या ६ विषयांचा समावेश होता.



बीड : दैनिक मराठवाडा पत्र कार्यालयास ह.भ.प. वसंत महाराज यांनी भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करताना दैनिक मराठवाडा पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे.



वडवणी - वडवणीत नामांकित असलेले बाळु नाना जाधव यांच्या श्री.समर्थ किराणा स्टोअर्स या शॉपच्या उद्धघाटनाप्रसंगी - ह.भ.प शांतीब्रम्ह नवनाथ बाबा, शिवसेना तालुकाप्रमुख विनायक मुळे,भाजपा नेते जमाले,बाळकिसन काकाजी तापडिया, आंडील, सरपंच धपाटे, लांडे, पत्रकार संभाजी लांडे व आदींनी उपस्थित राहुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## प्रशासन उपोषणाची दखल घेईना

**बीड । प्रतिनिधी**

अंबाजोगाई उपजिल्हाधिकारी कार्यालय समोर गेल्या अनेक दिवसापासून पारधी समाजाचे आमरण उपोषण कुटुंबासह पोलीस प्रशासनाच्या विरोधात उन्हातान्हात चालू आहे. अंबाजोगाई उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर ना त्यांना टेन्ट नाही ना कुठलीही व्यवस्था नाही परंतु त्या पारधी समाजाच्या आमरण उपोषणास ना पोलीस प्रशासनाने दखल घेतली ना उपजिल्हाधिकारी यांनी दखल घेतली नाही तर या उपोषणाकडे सामाजिक क्षेत्रातील काम करणाऱ्या सेवाभावी संस्थेने ही दखल न घेतल्यामुळे आमरण उपोषणास बसलेल्या पारधी समाजाच्या कुटुंबाचे बेहाल होत आहेत.

# आष्टी मतदार संघातील विकास कामांना प्रशासकीय मान्यता -आ. सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**



आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नामुळे आष्टी विधानसभा मतदारसंघामध्ये नऊ कोटी रुपये किमतीचे साठवण तलाव कोल्हापूर पद्धतीचे बंधारे आणि भेटेल सीना बंधारे या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. मृद व जलसंधारण विभाग, संभाजीनगर या विभागातील आष्टी विधान सभा मतदार संघातील. शिरुर कासार तालुक्यातील १) कोळवाडी को. प. बंधारा क्रं. -३ किंमत ३.०६ / कोटी रु, २) आष्टी तालुक्यातील शेरी बु. साठवण तलाव, किंमत ३.७९ / कोटी रु. या कामांच्या.. ई- निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आलेल्या आहेत. त्याच बरोबर शिरुर कासार तालुक्यातील ० ते १०० हेक्टर क्षमतेच्या २ कोटी ८५ लक्ष रु. किंमतीच्या ७ बंधारे कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. नांदेवली (सराटी ओढा) क्रं.१ किंमत ४०,३७,२५८ / रू., नांदेवली (शिवा शेत ओढा) क्रं.२ किंमत ४४,०२,२६७ / रू., माळेवाडी (ग्रा.पं. नांदेवली) क्रं.१ किंमत ३,७७,५५२/ रू., माळेवाडी सावतानगर ( ग्रा. पं. नांदेवली) क्रं.२, किंमत ३,७२,३९३/ रू., निमगाव मायंबा (लमाणवाडी) सि.ना.ब. क्र.१ किंमत ४१,२१,१५७ / रू.,६) निमगाव मायंबा सि. ना.ब. किंमत ३६,९९,९८६/ रू., उखंडा चकला (कदम वस्ती)गेटेड सि.ना.बं. क्र.१ किंमत ३,०२,२६२ / रू. या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे गेल्या अनेक दिवसांपासून या परिसरातील शेतकऱ्यांची सिंचन सुविधा मिळाव्यात अशी मागणी असल्यामुळे आमदार सुरेश धस यांनी वारंवार पाठपुरावा केल्यामुळे अखेर आज या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आल्या आहेत. त्याबद्दल आष्टी आणि शिरूर कासार तालुक्यातील जनतेमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

# सिंधुताई सपकाळ पुरस्काराने वैशालीताई रोहिटे सन्मानित

**बीड । प्रतिनीधी**




गेल्या १८ वर्षापासून बीड शहरांमध्ये जय भवानी सेवा संस्थेच्या मांध्यमाने ग्रामीण भागातील वंचित व ऊसतोड मजुरांच्या मुलांसाठी निवासी गुरुकुल सुरु करून वंचित , गरजू मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम वैशालीताई रोहिटे करत आहेत. मराठवाड्यातील सहा जिल्ह्यामधून शेकडो विद्यार्थी आतापर्यंत या संस्थेमधून शिक्षण घेऊन उच्च विद्या विभूषित झालेले आहेत. त्यांच्या या सातत्यपूर्ण कामगिरीचा व अंगणवाडी सेविका म्हणून आहेर वडगाव येथील शिंदे तावरे वस्तीवर प्रभावीपणे विविध उपक्रम राबवून मुलांशी व्यक्तिगत संवाद साधून त्यांच्यासाठी केलेले छोटे छोटे प्रयोग व बालमातांसाठी राबवलेले विविध उपक्रम यांची योग्य ती दखल घेऊन स्त्री शक्ती प्रतिष्ठान व पसायदान सेवा प्रकल्प यांनी पद्मश्री सिंधुताई सपकाळ सेवा रत्न पुरस्कार देऊन सन्मान केला. या सेवा रत्न पुरस्कार सोहळ्यासाठी पसायदान सेवा प्रकल्पाच्या रंजनाताई दराडे, स्त्री शक्ती प्रतिष्ठानच्या सौ जयश्रीताई विधाते, महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण व संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉक्टर दत्ताजी नलावडे , ज्येष्ठ समाजसेवक गौतम भाऊ खटोड व अन्य अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होते .या सन्मानाने नक्कीच कामातील जबाबदारी व आणखी प्रभावीपणे काम करण्यास मदत होईल.

# अधीक्षक अभियंता घुमेंची विविध प्रश्नांवर नाईकवाडेंनी घेतली भेट

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराला माजलगाव बॅक वॉटर योजनेतून पाणी पुरवठा केला जात आहे. या पाणी पुरवठ्याची महावितरण कंपनीची एकूण ३३ कोटींची थकबाकी बीड नगरपालिकेकडे आहे, असे असताना शहरात अमृत अटल योजना जवळपास पूर्ण झाल्यानंतर सुद्धा फक्त लोड एक्सटेंशन वाढवून मिळत नसल्याकारणाने बीड शहराचा पाणीपुरवठा दहा ते पंधरा दिवसांनी होतो. ज्यामुळे सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत नागरिकांची प्रचंड हेळसांड होत आहे. त्यामुळे पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी लोड एक्सटेंशन वाढवून द्या अशी मागणी बीड नगरपालिकेचे गटनेते फारुक पटेल व माजी सभापती, नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी महावितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता एम.डी. घुमे यांच्याशी त्यांच्या दालनात विस्तृत चर्चा केली. दरम्यान याबाबत पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी अधीक्षक अभियंत्यांना सूचना देत शिष्टमंडळाशी चर्चा करण्याचे सांगितले. त्यानंतर झालेली चर्चा यशस्वी झाली असून महावितरणकडून याबाबतचा अहवाल वरिष्ठांकडे पाठवला जाणार आहे. यामुळे हा प्रश्न लकवरच मार्गी लागण्याकरिता एक पाऊल पुढे पडले



आहे. महावितरण कंपनीची बीड नगरपालिकेकडे असलेल्या थकबाकीमुळे अमृत अटल योजना जवळपास पूर्ण झाल्यानंतर सुद्धा फक्त लोड एक्सटेंशन वाढवून मिळालेला नाही. सध्या बीड शहराचा पाणीपुरवठा दहा ते पंधरा दिवसांनी होतो. ज्यामुळे सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत नागरिकांची प्रचंड हेळसांड होत आहे. अनेक भागात नागरिकांना विकतचे पाणी घ्यावे लागत आहे. हाच धागा पकडत गत चार दिवसापूर्वी न.प.चे माजी उपाध्यक्ष, नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार व पालकमंत्री धनंजय मुंडे यांना याविषयी निवेदन देत हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची विनंती केली होती. त्यावेळी पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी त्यानंतर गटनेते फारुक पटेल व नगरसेवक अमर नाईकवाडे यांना बीड महावितरणचे अधीक्षक अभियंता श्री घुमे यांना भेटण्याचे सुचित केले होते. त्या अनुषंगाने सोमवारी (दि.११) पटेल-नाईकवाडे यांनी अधीक्षक अभियंत्यांना भेटून बीड शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी लोड एक्सटेन्शन वाढवून मिळणे बीड शहराच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहे हा मुद्दा त्यांच्यासमोर पोटतिडकीने मांडला, यावेळी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी श्रीमती नीता अंधारे, अभियंता राहुल टाळके आदी उपस्थित होते.'याबाबतचा प्रस्ताव तातडीने वरिष्ठांकडे पाठवला जाईल' अशी ग्वाही अधीक्षक अभियंता एम.डी.घुमे यांनी दिली. दरम्यान पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केलेली यशस्वी शिष्टाई अन् त्यानंतर पटेल-नाईकवाडे यांनी पालिकेच्या सीओंना सोबत घेवून अधीक्षक अभियंत्यांना हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी केलेली विस्तृत चर्चा यामुळे हा प्रश्न लवकरच मार्गी लागण्याचे संकेत मिळाले आहेत. दरम्यान तसेच बीड शहराचा पाणी प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत शासन व प्रशासन स्तरावर पाणी प्रश्नावर आमचा पाठपुरावा सतत सुरूच राहील असे पटेल व नाईकवाडे यांनी म्हटले आहे.

## आचारी बेपत्ता

**केज । प्रतिनिधी**

सोलापूर जिह्यातील आहेरवाडी येथील भैरअप्पा शिवयोगप्पा बहिरगुंडे ( वय ३३ ) यांचे कुटुंब सध्या केज शहरात कानडी रोड भागात वास्तव्यास आहे. तर भैरअप्पा बहिरगुंडे हे मागील आठ नऊ महिन्यापासुन शहरापासून जवळ असलेल्या पिसेगाव शिवारातील दिपक शंकरराव वळसे यांचे कन्हैया हॉटेलच्या समोर कन्हैया वडापावचे गाड्यावर आचारी (वस्ताद) म्हणुन काम करीत होते. ते कुटुंबीयांसह ७ मार्च रोजी रात्री १० वाजता गावाकडे जाण्यासाठी बसस्थानकावर आले असता हॉटेल मालक दीपक वळसे यांनी त्यांची समजूत काढून त्यांना गावाकडे जाऊ दिले नाही. त्यानंतर रात्री ११ वाजता हॉटेलवर झोपण्यासाठी भैरअप्पा बहिरगुंडे गेले. मात्र ८ मार्च रोजी सकाळी हॉटेलमध्ये दिसून आले नाहीत. हॉटेलमधील सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले असता ते पहाटे ३ वाजता कन्हैया हॉटेलमधुन समोरुन गेल्याचे दिसून आले. ते परत न आल्याने नातेवाईकांकडे विचारपुस केली. मात्र त्यांचा शोध लागला नसून मालकास काही एक न सांगता बेपत्ता झाल्याची तक्रार त्यांची पत्नी कावेरी भैरअप्पा बहिरगुंडे यांनी दिल्यावरून केज पोलिसात मिसिंगची नोंद करण्यात आली आहे.

# मतदान जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांचा सहभाग आवश्यक

**परळी । प्रतिनिधी**

मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. लहान मुलांनी परिवारातील सदस्यांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करावे. आपल्या घरात किती मतदार आहेत, त्यांची यादी करण्याचा गृहपाठ विद्यार्थ्यांना दिल्यास फायदा होऊ शकतो. मतदानाविषयी जनजागृती करण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवावा, असे प्रतिपादन जनाधार फार्मर कंपनी चे चेअरमन मुक्ताराम सोनवने यांनी केले. परळी विज्ञान झालेल्या मतदार जागृती अभियान कार्यक्रमात त्यांनी मतदार जागृतीविषयी मार्गदर्शन केले. युवा व खेल मंत्रालय भारत सरकार संलग्न नेहरू युवा केंद्र,बीड अंतर्गत जिल्ह्यात मतदार जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. आयोजन करण्यात आले होते. शिवहारी घुगे यांनी मतदार जागृतीसाठी विद्यार्थ्यांचा कसा उपयोग होऊ शकतो, हे स्पष्ट केले. मुख्याध्यापक- शिक्षक- विद्यार्थी-पालक अशी साखळी तयार करून निवडणूकसंबंधी माहिती मतदारांपर्यंत लवकर पोहोचवता येते. हे एक प्रभावी माध्यम आहे, असे त्यांनी सांगितले. भारतीय निवडणूक नियंत्रण यंत्रणा या विषयावर परदेशातील अनेक संशोधकांचे शोधनिबंध आहेत. लोकशाहीत मतदानाला असलेले महत्त्व सर्वांना समजावे आणि प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजवावा, असे मत व्यक्त केले.यावेळी युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टीत कुस्त्यांची स्पर्धा संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील रुईनालकोल येथील जागृत देवस्थान असलेल्या दि.८ ते १० मार्च २०२४ असा तीन दिवस यात्रा उत्सव संपन्न झाला.शनिवारी छबीना व पालखी मिरवणुक झाली.रात्री महेश मंदिरासमोर जागरण गोंधळ झाले.छबीना मिरवणुकीत शोभेच्या दारुची अतिषबाजी करण्यात आली.सकाळी मालती ईनामदार यांचा हजे-याचा कार्यक्रम झाला. रविवारी रात्री मराठी परंपरा



जोपासणारा पारंपारिक मालती ईनामदार यांचा लोकनाट्य तमाशा लोकगीते ,लावणी ,बतावणी, सोबत वेस्टर्न नृत्याविष्कार असा मनोरंजनाचा कार्यक्रम झाला. रविवारी सायंकाळी ४ ते ७ यावेळात जंगी कुस्त्यांचा हंगामा झाला. यावेळी माजी आ.भीमराव धोंडे यांनी सर्व पैलवानास बक्षीस दिले. या जंगी हंगाम्यात महाराष्ट्र केसरी सईद चाऊस आणि सईद फहाद यांची २५ हजार रु ची दवंडीची कुस्ती झाली.मयुर तांबे आणि साहील शेख यांची १० हजार रु ची कुस्ती झाली.ओम आंधळे आणि तुषार खांडवे यांची १० हजार रु ची कुस्ती झाली.अमोल दिंडे आणि मयुर कणसे,शिवनाथ वनवे अशोक मोटे,अमृत कर्डीले, राम क्षीरसागर यांच्या कुस्त्या झाल्या.यावेळी माजी आ.भीमराव धोंडे यांनी वैयक्तिक कुस्त्या करणाऱ्या पैलवानांना बक्षीस दिले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com